CMYK

बीड । सोमवार

२१.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : २१

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# दिव्यांग विद्यार्थ्यांना 'लु.च.नारे' ते शालेय कर्मचारी कोण ?

### दिव्यांग विद्यार्थ्यांना लुचणारे...

शासनाकडून मतिमंद, अस्थिव्यंग, मूकबधिर या शाळेतील कर्मचाऱ्यांच्या वेतनावर व परिपोषनावर लाखो रुपये येतात.तरी देखील जेवण दर्जाहीन शिक्षण गुणहीन अशी परिस्थिती आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना अक्षरशः लुचणारे शिक्षक व संस्था काय कामाच्या असे प्रश्न उपस्थित होते आहेत.



## गोरगरीब विद्यार्थ्यांचा 'त्या' शिक्षकांना तळतळाट लागणार !

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा समाज कल्यान अधिकारी, जि.प. बीड श्रीमती एस.एम मेश्राम व समान कल्यान निरीक्षक श्री. नखाले ए. बी. यानी स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळांना आचानक भेटी दिल्या असता अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. या मुकबधीर विदयालय नेकनूर, अस्थव्यंग विदयालय नेकनूर, मतिमंद विध्यालय उमरी, मुकबधीर विद्यालय उमरी या दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापकाना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. शालेय कर्मचारी व संस्था प्रशासनाकडून मतिमंद, आस्थव्यंग, मुकबधीर, या सारख्या विशेष गरजा असणाऱ्या मुलांना चांगली वागणूक मिळत नसल्याचे दिसून आले.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कारणे दाखवा नोटीस मध्ये नमूद करण्यात आले माहे की, मान्य क्षमतेच्या

### मेटीचा दणका

**भेटीनंतर संस्थेने व मुख्याध्यापकांनी रंग रंगोटीचे काम सुरू केले आहे. पलंग व गाद्या घेतल्या आहेत. शैक्षणिक अभिलेख पूर्ण करण्याचे काम सुरु होत आहे.**

५० टक्के पेक्षा कमी विदयार्थी उपस्थित आहेत, कर्मचारी विद्यार्थाना वाऱ्यावर सोडून गावात भटकंती करतात व ५० टक्के पेक्षा कमी कर्मचारी हजरच नसल्याने मस्टवर सहया करत नाहीत, विद्यार्थ्यांना भोजनामधे टमाट्याची दर्जाहीन व पातळ भाजी चवहीन भाजी चपाती देण्यात आली आहे. शैक्षणिक अभिलेखे अपूर्ण आहेत, निवास व्यवस्था अतिशय कोंदट असून विद्यार्थ्यांना सुगम्यता नाही, संगनक संच धूळखात ▶▶ उर्वरित पान २ वर



# बडतर्फ रणजित कासले खोटारडा, त्याला निवडणूक ड्युटी नव्हतीच; निवडणूक आयोगाने केले स्पष्ट

**स्ट्राँग रूमची सुरक्षा ते मतमोजणी प्रक्रिया सीसीटिव्ही कॅमेऱ्यात बंदिस्त, केंद्रीय राखीव सुरक्षा बलासह तीन स्तरीय सुरक्षेत पडली पार**

**कासलेचा आधार घेऊन आरोप करणारे तोंडघशी ; कासलेवर आयोगाच्या निर्देशानुसार गंभीर गुन्हे दाखल**

**बीड । प्रतिनिधी**

वादग्रस्त व सध्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओ द्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही; रणजित कासले याला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत, स्ट्राँग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन



सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली नव्हती, तो बीड सायबर विभागात नियुक्त




होता, असा स्वयंस्पष्ट खुलासा राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या घोषित केला आहे.

निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूम मध्ये ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी आपली ड्युटी होती व तिथे ईव्हीएम मशीन सोबत छेडछाड करता यावी, यासाठी आपल्याला दहा लाख रुपये देण्यात आल्याचा बोगस आरोप रणजित कासले याने सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून केला होता. त्याची गंभीर दखल ▶▶ उर्वरित पान २ वर

# केजच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हारुनभाई इनामदार हातात घालणार घड्याळ

## इनामदारांच्या माध्यमातून केजमध्ये अजितदादांची राष्ट्रवादी होणार आता भरभक्कम

**केज । प्रतिनिधी**

केजच्या राजकीय परिघावर मोठी घडामोड होताना दिसत आहे.येत्या २२ एप्रिल रोजी केज मध्ये राजकीय भूकंप होत असून केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे संस्थापक हरूनभाई इनामदार यांनी जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे अवलोकन करत केज



शहराच्या सर्वांगीण विकासासाठी उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या निर्णयामुळे केज शहराचे व बीड जिल्ह्याचे राजकीय समीकरण बदलणार आहे. केजच्या नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हरुणभाई इनामदार यांचा पक्षप्रवेश सोहळा ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : उद्योजक श्री. धनंजय भाऊ जाधव व सौ. पुजाताई मोरे - जाधव यांचा नुकताच शुभ विवाह संपन्न झाला. त्या निमित्तनाने त्यांना भावी आयुष्य सुख समृद्धीचे जावो हीं सदिच्छा व शुभेच्छा देतांना दैनिक मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे छायाचित्रात दिसत आहेत.*

# सहआरोपींना मुख्यमंत्र्यांनी वाचविले, देशमुख हत्याप्रकरणी मनोज जरांगे-पाटील यांचा आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

'परळीतील ज्यांच्या कार्यालयात खंडणी आणि संतोष देशमुख यांच्या खुनाचे नियोजन झाले, त्या मंत्र्यांना सहआरोपी केले नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना वाचविले,' असा आरोप मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांनी केला.

जरांगे यांनी मुळशी तालुक्यातील नेरे येथे पत्रकारांशी संवाद साधला. जरांगे म्हणाले, 'संतांची भूमी असलेला बीड जिल्हा बदनाम झाला आहे. राजकीय स्वार्थासाठी गुंड टोळ्यांच्या माध्यमातून खून केले जात आहेत. सत्तेतून पैसा, संपत्ती कमावणे यामुळे



बीड जिल्ह्यात नागरिकांना त्रास झाला आहे. हे थांबवण्यासाठी समाजाने खोट्याला खोटे म्हटले पाहिजे. विशेषकरून शासनाने खोट्याची पाठराखण करू नये, अशी अपेक्षा होती. संतोष देशमुख हत्येतील सहआरोपी यांना राजकीय पाठबळामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी वाचवले आहे. त्यामुळे सहआरोपी करण्याची मागणी करण्याचे बंद करावे लागले आहे.'

वाल्मीक कराडचा एन्काऊंटर करण्याची सुपारी धनंजय मुंडे यांनी दिली होती, असा दावा बीडचा निलंबित फौजदार रणजित कासले याने केला आहे. त्याबाबत जरांगे म्हणाले, 'तपासात सत्य पुढे येईल. त्याबाबतची सविस्तर माहिती नाही. २० वर्षे वाल्मीक कराडचा वापर केला, अनेकांच्या हत्या केल्या, पैसे कमावले. आता मारून टाकावे, असे धनंजय मुंडे यांना वाटले असेल. जे काही ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'आजोबांच्या प्रेताला तीन तासांनंतर बेदम मारहाण, गावकऱ्यांवर खूनाचा गुन्हा' बीडच्या 'त्या' वकील महिलेचा प्रताप? गावकऱ्यांचा आरोप



**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या अंबाजोगाई तालुक्यातील सनगाव येथे एका वकील महिलेल्या भोंग्याच्या कारणावरुन बेदम मारहाण झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी गावातल्या १० जणांवर ▶▶ उर्वरित पान २ वर

# वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक; तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव,पिंपरनई,फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण,मोर, लांडोर,वानर आदि वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्लयात मृत्यु झाला होता. वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही.महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे.परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# साक्षी विटेकर ची हृदय पिळवटुण टाकणारी करुण कहाणी



१९ एप्रिल २०२५ शनीवार रोजी हळदीचा कार्यक्रम, तर रविवार रोजी २० एप्रिल २०२५ रोजी विवाह सोहळा पार पडणार होता, परंतु नियतीने साक्षी च्या नशिबात बैल्कमेलींग, व्हिडिओ, फोटो चा आधार घेऊण क्रुर अत्याचार,बलात्कार,विनयभंग, आणि आत्महत्येचे ताट वाढूण ठेवले होते .... हवाई सुंदरीचे स्वप्न पाहणाऱ्या साक्षी चा इतका दुर्दैवी अंत होईल आसे स्वपन्नात हि कल्पना न केलेल्या परिवाराची मुख्यमंत्री, किंवा पालकमंत्री यांच्याकडे नाही तर चक्क फक्त एकनाथ शिंदे यांच्या कडुण न्यायाची अपेक्षा करणारे हृदयस्पृशी पत्र...

प्रति,
मा.ना.श्री. एकनाथ शिंदे साहेब,
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सन्माननीय महोदय,

साहेब, मी तुमची लाडकी बहीण तुम्ही मुख्यमंत्री झालात आणि राज्यातल्या अस्वस्थ झालेल्या बहिणींना आधार मिळाला. आपण मुख्यमंत्री असताना आपल्या म्हणजेच आम्हांसारख्या अगणित बहिणींना भावाचा बंध मिळाला. मी नाराज आहे, आज आपण उपमुख्यमंत्री आहात. मात्र माझ्यासाठी तुम्हीच लाडक्या बहिणीचे मुख्यमंत्री आहात.

दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेवर चालत आनंद दिघे साहेब यांची प्रेरणा घेऊन आपण राज्याचा कारभार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवशाही प्रमाणे हाताळत आम्हाला न्याय दिला.

आम्ही त्याबद्दल ज्ञात आहोत. परंतु आज आम्हाला तुमची कमतरता भासते. माझी मुलगी साक्षी तिला हवाई सुंदरी व्हायचे होते. मात्र एका क्षणात ती नाहीशी झाली.

काही मुलांनी तिची छेड काढली आणि साहेब, तुमच्या लाडकी बहिणीच्या मुलीने गळफास घेऊन जीवन संपविले. साहेब, आम्ही आस धरुन आहोत.





तुमची भाची साक्षी या जगात परत येणार नाही, हे आम्हाला देखील माहित आहे. मात्र त्या क्रुर नराधमांना देखील तेवढीच शिक्षा होणे अपपेक्षित आहे. आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब एका कार्यक्रमानिमित्त आमच्या बीड जिल्ह्यात आले. ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत.

सर्वांना माहित आहे, आपण असला असता तर पिडित बहिणीला भेटल्याशिवाय गेला नसता. याची प्रचिती महाराष्ट्राला आणि लाडक्या बहिणींना आहे.

साहेब, बीड मध्ये केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (KSK) महाविद्यालय आहे, याच महाविद्यालयात कला शाखेच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत होती...

काही मुलांनी तिची छेड काढली, तिला ब्लॅकमेल करुन तिच्यासोबत अनैतिक कृत्य केले. जबरदस्ती व्हिडीओ आणि फोटो काढण्यात आले,

या अत्याचाराला असाह्य होवून साक्षीने मामाच्या घरी धाराशिव येथे जावून गळफास घेत आत्महत्या केली.

आम्ही बीडचे रहिवासी आहोत, आरोपी देखील बीडचाच राहणारा आहे. माझ्या मुलीने मामाच्या गावी म्हणजेच धाराशिव येथे असताना गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यामुळे तो गुन्हा धाराशिव सिटी पोलिस ठाण्यात नोंद झाला आहे.

शिंदे साहेब, तुम्हीच आम्हाला न्याय देऊ शकता यावर आम्हाला ठाम विश्वास आहे.

यात अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले आहे.

धाराशिव येथील पोलिस उपअधीक्षक स्वप्नील राठोड यांनी आमचा कसलाही जबाब घेतला नाही. उलट आम्हाला अपमानित केले.

आम्हाला तासंतास कार्यालयाबाहेर बसविण्यात आले. (आम्हाला ताटकळत बसविले याचे सी.सी. टी.व्ही. कॅमेरात कैद आहे). आरोपीची बहिण देखील यात आरोपी आहे, मात्र ती पोलिस दलात कार्यरत असल्याने धाराशिव पोलिस आम्हाला कसलीही मदत करत नाहीत.

ज्या आरोपी मुलाने छेडखानी केली, माझ्या मुलीला ब्लॅकमेल केले त्याच्या मोबाईल मधील केलेली चॅटिंग पोलिसांनी अद्याप उघड केली नाही.

याच दरम्यान के. एस. के. महाविद्यालयातील इतर दोन मुलींनी देखील छेडखानीला कंटाळून आत्महत्या केली. आरोपी मुलाचे बीड शहरातील गुंडांशी संबंध असल्याने कोणताही पालक पुढे येऊन फिर्याद देत नाहीत.

या गुंडांची दहशत पाहता आम्ही कोणाला न्याय मागायचा हा प्रश्न पडला आहे.

साहेब आपण मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री असला असता तर या गुंडांचा खात्मा करुन आम्हाला न्याय दिला असता,

आताही केवळ तुमच्याकडूनच आम्हाला न्यायाची आस आहे, आपण आम्हाला न्याय देऊन गुंडांना शिक्षा द्याल एवढीच अपेक्षा आहे.

आपलीच लाडकी बहीण – कोयना सतीश विटकर.
रा. पालवन चौक, बीड ता.जि.बीड
मो.नं. ७९७२७१००४८

पान १ /४ वरून पुढे...

## दिव्यांग विद्यार्थ्यांना....

पडून आहेत, कर्मचारी ड्रेसकोड व ओळखपत्र वापरन नाहीत, या बाबींचा खुलासा करण्याबाबत सुचना देऊन कर्मचाऱ्यांचे वेतन व संस्थेचे वेतनेर अनुदान थांबविण्याबाबत कार्यवाही जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी केलेली आहे.

शासनाकडून दिव्यांग विद्यार्थाना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा त्यांच्यापर्यंत पोहचतात किंवा नाही या बाबत वेळोवेळी तपासणी करण्यात येते. मतिमंद व मुकबधीर असल्यामुळे या विद्यार्थ्यांना स्वतःच्या भावना व्यक्त करने अवघड जात असल्याने याचा गैरफायदा घेवून शालेय कर्मचारी अंधाधुंदी करतात, केवळ पगापुरते काम देखोल या कर्मचारी करत नसल्यामुळे प्रशासनाने नियमानुसार कार्यवाई केली आहे. या चारही शाळेतील संस्था प्रशासनाने व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी वेळीच सुधारणा न केल्यास दिव्यांग शाळी संहिता २०१८ मधीत तरतुदीनुसार सदर चारही शाळांची अनुज्ञाप्ती रद्द करण्यात येणार आहे.

## बडतर्फ रणजित...

घेत निवडणूक आयोगाने बीड जिल्हा प्रशासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते, त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत रणजित कासले बाबत अहवाल मागवला असता रणजित कासले हा त्या काळी बीड सायबर विभागात नियुक्त होता, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रियेत कुठेही नेमण्यात आली नव्हती, असे अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्दी पत्रकान्वये जाहीर केले आहे. विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन सील करताना सर्वपक्षीय उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच निवडणूक निरीक्षक उपस्थित होते. ज्या ठिकाणी ईव्हीएम मशीन ठेवल्या ती जागा २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली होती. त्या ठिकाणी तीन स्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली होती, ज्यामध्ये ईव्हीएम मशीनच्या सर्वात जवळ केंद्रीय पोलीस दलाचे अधिकारी कर्मचारी, इमारतीच्या परिघावर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान, इमारतीच्या बाहेर जिल्हा पोलीस दलाचे कर्मचारी नियुक्त होते. तसेच ईव्हीएम मशीनच्या टेंपरिंग बाबत कोणतीही तक्रार कुठल्याही राजकीय पक्षाने केलेली नाही, रणजीत कासलेचा या प्रक्रियेशी कोणताही संबंध येत नाही. बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने केलेले आरोप निराधार तथ्यही दिशाभूल करणारे तसेच लोकशाहीच्या सर्वात महत्त्वाच्या असलेल्या निवडणूक प्रक्रियेवर नाहक संशय निर्माण करणारे व गंभीर असल्याचे देखील निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. तसेच सदर निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक शांततेत आणि सुरक्षित पार पडल्याचे सुद्धा निवडणूक आयोगाने स्पष्टपणे नमूद केले आहे. रणजीत कासले याने आपल्या खात्यावर आलेल्या दहा लाख रुपयांबाबत जी माहिती दिली होती, ही माहिती देखील खोटी असल्याचे उघड झाले असून सदर पैसे त्याने सुदर्शन काळे नामक अंबाजोगाई येथील एका व्यावसायिकाकडून उसने घेतले होते तसेच त्यातील अडीच लाख रुपये अजूनही परत केले नसल्याची तक्रार स्वतः सुदर्शन काळे यांनी बीड जिल्हा पोलीस दलाकडे केली आहे. मात्र रणजीत कासले याने वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून केलेल्या आरोपांचा आधार घेत परळीच्या निवडणूक प्रक्रियेवर विविध आरोप करणारे राजकीय पुढारी मात्र चांगलेच तोंडघशी पडले आहेत. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परळी तहसीलच्या निवडणूक विभागाने रणजीत कासले यांच्या विरोधात परळी पोलिसात फिर्याद दिली असून रणजीत कासले याच्यावर विविध कलमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## केजच्या नगराध्यक्षा...

मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथील वानखेडे स्टेडियम येथे होणार आहे. केज शहराची सत्ता प्रामुख्याने जनविकास परिवर्तन आघाडीकडे आहे. जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व संस्थापक हरून भाई इनामदार यांच्या नेतृत्वाला केज शहराने पसंती दिलेली आहे. १४ फेब्रुवारी २०२२ साली नगराध्यक्ष पदाची सूत्र स्वीकारल्यानंतर केज शहरात विकासाचा झपाटा लावलेला आहे. बीड जिल्ह्यातील पाच नगरपंचायती पैकी क्रमांक एकची नगरपंचायत केज नगर पंचायत ठरली आहे. गेल्या तीन वर्षात विकास कामात आपली आगळीवेगळी ओळख निर्माण केली आहे. केज शहराला नवी ओळख मिळवून देण्यात हरूनभाई इनामदार यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. गेल्या तीन वर्षात स्वच्छतेच्या बाबतीत असेल, पाणीपुरवठ्याच्या बाबतीत असेल किंवा गावातील विकासाच्या बाबतीत असेल स्वयंपूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. जनसामान्यांचा विश्वास संपादन करून सामाजिक व राजकीय पटलावर स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. केज शहराचा कायापालट करण्यासाठी धर्मनिरपेक्ष पक्ष आणि नेतृत्व असणे आवश्यक आहे म्हणून केजच्या नगराध्यक्ष सीताताई बनसोड व हरुणभाई इनामदार यांनी योग्य असा राजकीय पर्याय निवडण्याचा अधिकार आपल्या तमाम कार्यकर्ता वर्गाकडे सुपूर्द केला होता. अखेर सर्वानुमते इनामदार यांनी विकासासाठी सत्ता आणि सत्तेसाठी विकास हे ब्रीद समजून घेत उपमुख्यमंत्री व राज्याचे अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे.त्या अनुषंगाने येत्या मंगळवार दिनांक २२ एप्रिल रोजी मुंबई येथे वानखेडे स्टेडियम या ठिकाणी नगराध्यक्ष सिताताई बनसोड, हरूनभाई इनामदार पक्षप्रवेश सोहळा होणार आहे.या पक्षप्रवेश सोहळ्यासाठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, ना.दिलीप वळसे पाटील, आ. धनंजय मुंडे,आ. विजयसिंह पंडित, आ.प्रकाशदादा सोळंके, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पक्षप्रवेशाची जोरदार तयारी इनामदार समर्थकांकडून केली जात आहे.शेकडो गाड्यांचा ताफा यात असणार आहे. इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय समीकरण बदलणार आहे.राष्ट्रवादीत अजितदादा गटाकडे प्रभावी व वक्तृत्व संपन्न मुस्लिम चेहरा नाही म्हणून हरून भाई इनामदार यांच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला याचा फायदा येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये होणार आहे. बीड जिल्ह्यात इनामदार यांना मानणारा मुस्लिम मतदार मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या व्होट बँकेला इनामदार यांच्या माध्यमातून फायदा होणार आहे.आगामी काळात राष्ट्रवादीची बुलंद तोफ म्हणून इनामदार यांच्याकडे पाहिले जाणार आहे शिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सुद्धा तेवढी ताकद हरूनभाई इनामदार यांना देणे गरजेचे आहे. सध्या जनविकास परिवर्तन आघाडीच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व संस्थापक हरुनभाई इनामदार तसेच केज नगर पंचायत मधील जनविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच ग्रामीण भागातील कार्यकर्ते, पदाधिकारी अनेक गावचे सरपंच, उपसरपंच ,सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हाइस चेअरमन याशिवाय जिल्हाभरातील असंख्य कार्यकर्ते इनामदार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. इनामदार यांच्या पक्षप्रवेशामुळे अजितदादांची राष्ट्रवादी आणखी भक्कम होणार असल्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे.

## सहआरोपींना...

आहे, ते तपासात निष्पन्न होईल.' ..म्हणून 'दीनानाथ'वर कारवाई नाही !–'मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सगेसोयरे असल्याने गर्भवतीच्या मृत्यूप्रकरणी दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कारवाई होत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान करणाऱ्यांनाही सोडले जाते. शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देऊन फसवते. सत्ता हातात आली म्हणून अत्याचार केल्यास जनता सोडणार नाही.' 'त्या' अधिकाऱ्यांना घरी बसवणार

'कुणबी नोंद सापडलेल्या लोकांना अधिकारी जाणीवपूर्वक प्रमाणपत्र देत नाहीत. अशा अधिकाऱ्यांचे निलंबन करण्याची मागणी केली जाणार आहे. अधिकाऱ्यांच्या पाठीमागे कोणतीही राजकीय शक्ती असली तरी त्यांना घरी बसवल्याशिवाय शांत बसणार नाही,' असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला.

## 'आजोबांच्या प्रेताला...

गुन्हा नोंद झाला आहे. ॲड. ज्ञानेश्वरी अंजान असं या वकील महिलेचं नाव आहे. ही घटना १४ एप्रिल रोजी घडली. मात्र गावकऱ्यांनी हा सगळा बनाव असल्याचं म्हटलंय. सदरील वकील महिला आणि त्यांचं कुटुंब गावाला कायम त्रास देतं असल्याचा गावकऱ्यांचा आरोप आहे. गावातल्या लोकांनी वृत्तवाहिन्यांना दिलेल्या माहितीनुसार, लोकांना खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवून त्रास देण्याचं काम हे कुटुंब करत असतं.

गावातील खासगी शिक्षक गोपाळ अंजान यांनी दावा केला की, या कुटुंबाने मृत आजोबांच्या प्रेताला मारहाण करुन खोटा गुन्हा दाखल केला होता. 'मुंबई तक वर ते बोलत होते... मृत आजोबांना मारहाण– गोपाळ अंजान म्हणाले की, मारहाणीचं समर्थन कुणीही करणार नाही. मात्र तो प्रकार खरा की खोटा ते पाहिलं पाहिजे. त्या कुटुंबाने आजवर गावकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत. या अगोदर त्यांनी एक ३०२ (खुनाचा गुन्हा दाखल केला होता. स्वतःचे आजोबा मयत झालेले असताना त्यांच्या मृत्यूपश्चात तीन तासांनंतर सख्ख्या आजोबांच्या मृत शरीरावर काठ्यांनी बेदम मारहाण केली. त्यांचा मुलगा आणि वकील मॅडने ही मारहाण केली होती. मात्र गावातल्या सात जणांवर हा ३०२ दाखल केला होता. तपासाअंती हा खोटा गुन्हा आहे, हे सिद्ध झालेलं होतं. तरीही प्रशासनाने त्यांच्यावर कोणती प्रतिबंधात्मक कारवाई केलेली नाही. अंजान पुढे म्हणाले, ३०२ चं रेकॉर्ड आजही युसूफवडगाव पोलिस ठाण्यात आहे. पीएम रिपोर्टमध्ये नैसर्गिक मृत्यूचं कारण स्पष्ट झालं होतं. फुफ्फुसाला आणि मेंदूला सूज आल्यामुळे मृत्यू झाल्याचं सिद्ध झालं होतं. मृत्यूच्या तीन तासांनंतर प्रेताला मारहाण केलेली होती. एकदा वकील मॅडमच्या आईने घरगुती कारणामुळे विष घेतलं होतं. रुग्णालयात उपचार घेताना मेंटल असल्याचं कारण देऊन विष घेतल्याचं म्हटलं होतं. मात्र त्यानंतर वकील मॅडमच्या सांगण्यानुसार गावातील तीन जणांवर खोटा गुन्हा दाखल केला होता. त्याही केसमध्ये आरोपी आणि फिर्यादी यांची नार्को टेस्ट करावी. मी जर दोषी असेल तर मला फाशी देण्यात यावी. विनाकारण गावकऱ्यांची पिळवणूक थांबवावी, अशी मागणी आहे. असं गावकरी म्हणाले. इतर गावच्या काही लोकांना हाताशी धरुन त्यांनी गावातील सात जणांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला होता. त्या केसमध्ये सातही जण निर्दोष सुटलेले आहेत. खोटे गुन्हे दाखल करणं, हा या कुटुंबाचा पेशा आहे. त्या माध्यमातून पेशांची मागणी करणं, असे प्रकार सुरु असल्याचा खळबळजनक दावा गावकऱ्यांनी केला आहे. असं असलं तरी वकील महिलेला नेमकी मारहाण कुणी केली ? असा प्रश्न उपस्थित होतोय.

## वनक्षेत्रातील पाणवठे...

पडल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केली आहे.

## खडकी येथे श्री...

श्री काळभैरवनाथ मंदिर असून या मंदिराला क दर्जा प्राप्त आहे. दरम्यान श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सव हा दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी देखील दि.२१ रोजी सकाळी पायी चालत जाऊन कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला स्नान करून अभिषेक घालण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी गावातूनच छबिना मिरवणूक काढली जाणार आहे. यानंतर जुन्नर तालुक्यातील नावाजलेला व सध्या महाराष्ट्रात धुमाकुळ घालत असलेला स्वरसंगम हा आर्केस्ट्रा आयोजित करण्यात आलेला आहे. तसेच दि.२२ रोजी सायंकाळी तीन वाजता कुस्तीचा आखाडा आयोजित करण्यात आलेला आहे. तरी या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा केला जाणार असून पंचक्रोषीतील भाविक–भक्तांनी मोठ्या संख्येने यात्रेला उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असेल आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीचे सचिव संतोष थोरात, साईनाथ उघडे, भास्कर सानप, सतिश उघडे, विनोद नागरगोजे, प्रकाश काशिद आदींसह ग्रामस्थांनी केले आहे.

## भारतीय बौद्ध...

बी सी डोंगरे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे ,सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते, संस्कार उपाध्यक्ष गुलाब धाईजे सह जिल्हा तालुका पदाधिकारी व महिला उपासीका यांची उपस्थिती होती या प्रसंगी मान्यवरांकडुन नवनिर्वाचित महिला कार्यकारिणी ला शुभेच्छा देण्यात आल्या या बैठकिच सुत्रसंचलन भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हा कोषाध्यक्षा भावनाताई कांबळे यानी केले या नंतर आभार प्रदर्शन व शरनतय घेऊन बैठकिचा समारोप करण्यात आला.

## गोळीबार प्रकरणातील...

सराईत गुन्हेगार असुन त्याचे यापुर्वी गेवराई पोस्टे येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल,मा. अप्पर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी ,मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड विशाल खांबे,यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष श्रीनिवास खांडेकर यांनी केला असुन त्यांना तपास दरम्यान पोउपनि आय एम शेख, पोउपनि किरण हावले, पोहेकॉ अशोक नागरगोजे, पोहेकॉ केंद्रे, पोकॉ भोजने, पोकॉ सिध्दीकी सर्व गोंदी पोलीस स्टेशन यांनी मदत केली आहे.

## अंबाजोगाईमध्ये गुटखा...

नांव कृष्णा मुकुंद भालेकर रा. स्वातंत्र सैनिक कॉलणी, मोरेवाडी ता अंबजोगाई असे होते त्याचे ताब्यातुन शासनाने प्रतिबंधीत केलेला सुगंधीत पान मसाला गुटखा व एक चार चाकी ओमीनी कार असा एकुण १,१५,०६६ रु मुद्देमाल जप्त करुन आरोपी विरुध्द पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर गु.र.नं ११६/२०२५ अन्वये पोलीस हवालदार विकास राठोड यांचे फिर्यादीवरुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पळुन गेलेला कृष्णा मुकुंद भालेकर याचा शोध पोलीस घेत आहेत. सदरील कारवाई हि श्री नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक,बीड, श्री चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई, श्री उस्मान शेख, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, महेश जोगदंड, राजु पठाण, नितीन वडमारे, विकी सुरवसे यांनी केली आहे.

## चोरीच्या संशयावरून ....

आहे. याची शिवाजीनगर पोलिसांना माहिती दिली असता पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन महिलेला ताब्यात घेतले आहे. अधिक तपास करीत असून, यातून ही महिला खरेच चोरीच्या उद्देशाने आली होती की, इतर काही कारण आहे. हे उघडकीस येईल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# सोलापुरातील डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणात सर्वात मोठा ट्विस्ट, सुसाईड नोटमध्ये महिलेचे नाव, ओळखही पटली

**सोलापूर । प्रतिनिधी**

सोलापुरातील प्रसिद्ध न्युरो फिजिशीयन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी मोठी बातमी समोर आली आहे. डॉ. वळसंगकर यांना आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी एका महिलेविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वळसंगकर यांच्या हॉस्पिटलमध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून काम करणाऱ्या मनीषा मुसळे-माने हिच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येपूर्वी डॉ. वळसंगकर यांनी एक चिठ्ठी लिहलेली होती, यामध्ये मनीषा मुसळे-माने हिच्यामुळेच टोकाचे पाऊल उचलत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार रात्री १० च्या सुमारास पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून रात्रीच न्यायालयाची परवानगी घेऊन आरोपी महिलेला अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली होती.

कर्मचाऱ्याकडून धमकी मिळाल्याने तणावाखाली असल्याची चर्चा- डॉ. वळसंगकरांना रुग्णालयातील सर्व आर्थिक व्यवहार हे कागदोपत्रांवरती हवे होते. त्यासाठी त्यांचा आग्रह देखील होता, पण आजकाल रुग्णांकडून उपचाराची रक्कम कोणतीही नोंद न करता स्वीकारली जात होती. यासंदर्भात त्यांनी आक्षेप नोंदवला होता. पण त्यांचं कोणी ऐकत नव्हतं. जी महिला कर्मचारी अशी रक्कम स्वीकारत होती, तिला डॉ. वळसंगकरांनी कामावरून देखील काढलं होतं. पण नंतर या महिला कर्मचाऱ्याने कामावरून काढल्यानंतर आत्महत्या करण्याची धमकी डॉक्टरांना दिली होती. तिच्या धमकीवरून डॉक्टरांना पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा सल्ला दिला होता. मात्र, डॉक्टरांना ते मान्य नव्हते. या प्रकरणामुळे देखील डॉक्टर तणावाखाली गेल्याचे आणि त्यांनी असं टोकाचं पाऊल उचलल्याचीही चर्चा आहे.

कोण होते डॉ. शिरीष पद्माकर वळसंगकर ? - डॉ. शिरीष वळसंगकर हे सोलापुरातील न्युरोफिजिशियन होते. त्यांचे वय ६९ वर्ष होते. त्यांच्या नेतृत्वाखाली S P Institute of Neurosciences हे अत्याधुनिक सुविधांसह रुग्णालय त्यांनी उभारलं आहे. डॉ. वळसंगकर यांनी सोलापूरमधील दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स येथून महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी डॉ. व्ही.एम. मेडिकल कॉलेज, सोलापूर येथून MBBS, MD चे शिक्षण घेतले. लंडनमधील रॉयल कॉलेज ऑफ फिजिशियन्समधून MRCP (UK) ही पदवीही मिळवली आहे. देशभरातील नामांकित मेंदूविकार तज्ज्ञांमध्ये त्यांचा नावलौकिक होता. १९९९ मध्ये हॉस्पिटल रुग्ण सेवेत आले. कर्नाटक, तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागातील अत्याधुनिक उपकरणांनी सुसज्ज असे त्यांचे एसपीएम न्यूरो हॉस्पिटल आहे. न्यूरोलॉजी संबंधी निदान, उपचार, गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, संशोधनासाठी त्यांचे हॉस्पिटल मानांकित होते.

मेंदू विकारासंदर्भातील शस्त्रक्रियावरील उपचाराचे शोधनिबंध त्यांनी देश, विदेशातून सादर केले आहेत. कोल्हापूरच्या सीपीआर हॉस्पिटल, कुर्डुवाडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे इंटर्नशीप तर डॉ. व्हीएम मेडिकल कॉलेजमधून पदव्यूत्तर प्रशिक्षण पूर्ण केले. लंडनमधील मैदा वेल न्यूरोलॉजिकल हॉस्पिटल येथे त्यांनी काहीकाळ प्रशिक्षण घेतले. बॉम्बे हॉस्पिटलमधून त्यांनी रुग्णसेवेला सुरुवात केली. वैद्यकीय सेवेशिवाय देखील ते प्रचंड हौशी होते. भारतभर प्रवास करण्यासाठी त्यांनी स्वतःचे विमान देखील खरेदी केले होते. देशातील विविध भागात ते याचं विमानाने फिरत होते. इतकंच नाही तर अनेक शिकाऊ वैमानिकांना देखील त्यांनी मार्गदर्शन केले आहे.




### डॉ. वळसंगकर यांच्या आत्महत्येपूर्वीचा घटनाक्रम

**शुक्रवारी (१८ एप्रिल) रात्री ८ वा. एस.पी ऑफ न्युरो सायन्सेस येथे रुग्णांची तपासणी करून घरी परतले. रात्री ८:३० बेडरूमच्या बाथरूममधून बंदुकीच्या गोळीचा आवाज आला. त्यानंतर दुसरी राउंड फायर झाल्यावर कुटुंबीयांनी बेडरूममध्ये धाव घेतली. यावेळी डॉ. शिरीष वळसंगकर हे रक्ताच्या थारोळ्यात माखलेले दिसले. रात्री ९ वा. त्यांच्याच रुग्णालयामध्ये डॉ. शिरीष वळसंगकर यांना दाखल करण्यात आले. मुलगा डॉ. अश्विन आणि सून डॉ. शोनाली यांच्यासह ५ तज्ज्ञ डॉक्टरांनी जवळपास पाऊण तास त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. रात्री १०:२० मिनिटांनी डॉक्टर शिरीष वळसंगकर यांना मृत घोषित करण्यात आले. रात्री १०:३० वा. पोलीस उपायुक्त विजय कबाडे हे घटनास्थळी दाखल झाले आणि बेडरूम सील केले. रात्री १० : ४५ वा. फॉरेन्सिकची टीम दाखल झाली आणि बेडरूममधील बंदूक काडतूस, रक्ताचे नमुने घेतले.**

# समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगविण्याची जबाबदारी ही समाजाची : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे । प्रतिनिधी**

पाश्चिमात्य संकृती ही ज्याच्याकडे शक्ती आहे तो जगेल असे म्हणते. भारतीय संस्कृती मात्र, जो जन्माला आला आहे तो जगेल आणि समाज त्याला जगवेल असे सांगते. त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीला जगविण्याची जबाबदारी ही समाजाची आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्र, पुणे आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी आयोजित दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविण्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र प्रदान सोहळा भांडारकर संस्था लॉ कॉलेज रोड येथे संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, विकलांग पुनर्वसन केंद्राचे अध्यक्ष दत्तात्रय चितळे, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सागर ढोले पाटील, केंद्राचे विश्वस्त व प्रमुख विनय खटावकर, सचिव राजेंद्र जोग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेचे सदस्य राजेश पांडे आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले, भारत विकास परिषद आणि ढोले पाटील एज्युकेशन सोसायटीने अत्यंत नियोजनबद्ध व्यवस्था करून आणि सेवा आणि समर्पण हा भाव ठेऊन दिव्यांगांना कृत्रिम अवयव देण्याचा एक नवीन जागतिक विक्रम तयार केला. सेवेचाच भाव ठेऊन काम करणाऱ्यांसाठी विक्रम बनवावा लागत नाही तर तो एक विसावा असून हा प्रवास कधीच थांबत नाही. हा विक्रम पुन्हा हीच संस्था मोडेल असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. संस्थेच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने या केंद्राचे नाव दिव्यांग पुनर्वसन केंद्र करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गेल्या काही वर्षांमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिव्यांगांच्या संदर्भात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. विशेषतः आर्टिफिशियल लिम्ब्ज मनुफॅक्चरिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया (अलिम्को) स्थापन केल्यामुळे पूर्वी जे अत्याधुनिक कृत्रिम अवयव (प्रोस्थेटिक पार्ट्स) आयात करावे लागत होते; ते तयार करण्याचे तंत्रज्ञान भारतात आणल्याने जागतिक गुणवत्तेचे कृत्रिम अवयव आपल्या देशात तयार होत आहेत. मोठ्या ग्रामीण भागातील लोकांपर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचले पाहिजे यासाठी केंद्र सरकारने योजना सुरू केली असून शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला आहे, असे देखील मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. राज्यातील शासकीय कार्यालये, संकेतस्थळे या सर्व ठिकाणी सुगमता आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. १०० दिवसांच्या कार्य आराखड्यामध्ये दिव्यांगांकरिता सुगमता निर्माण करणे हेदेखील लक्ष्य दिले आहे, अशी माहिती देखील श्री. फडणवीस यांनी दिली.

श्री. चितळे यांनी माहिती दिली. या विक्रमात दिव्यांगांना ८ तासात ८९२ अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त कृत्रिम हात, पाय अवयव बसविण्यात आले. संस्थेला या कार्यासाठी आर्थिक मदतीसाठी मोठ्या प्रमाणात दानशूर व्यक्ती, संस्था पुढे येतात. सेवेतून चांगले संस्कार व्हावेत यासाठी प्रयत्न असतो, असेही ते म्हणाले.

यावेळी श्री. ढोले पाटील, श्री. खटावकर यांनी मनोगत व्यक्त केले. गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे परीक्षक स्वप्नील डांगरेकर यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या उपस्थितीत भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्राला जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी जागतिक विक्रमाबाबत माहितीची चित्रफित दाखविण्यात आली. प्रायोजक संस्थांच्या प्रतिनिधींचा सत्कार करण्यात आला.

# अमोल मुळे यांना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार बीड येथील पत्रकार अमोल भास्कर मुळे यांना जाहीर करण्यात आला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीप तरकसे यांनी या पुरस्काराची घोषणा केली.

बीड येथील पद्मपाणी प्रतिष्ठानच्या वतीने १७ वर्षांपासून संविधान दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यंदाही पुरस्कारासाठी निवड समितीची बैठक नुकतीच पार पडली. यामध्ये पत्रकारिता क्षेत्रातून आदर्श पत्रकारिता पुरस्कार पत्रकार अमोल मुळे यांना जाहीर करण्यात आला. सन्मानचिन्ह, संविधानाची प्रत, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरुप आहे. ४ मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मान्यवरांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. अमोल मुळे यांनी पत्रकारितेच्या



माध्यमातून वंचित घटकांच्या समस्या मांडल्या आहेत. कृषी, आरोग्य, व सामाजिक क्षेत्रातील बातमीदारीमध्ये त्यांनी छाप पाडलेली आहे. अभ्यासू व संवेदनशील पत्रकार अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर केला गेला. अमोल मुळे यांना यापूर्वी महाराष्ट्र शासनाचे जिल्हा युवा पुरस्कार, राजमाता जिजाऊ स्वावलंबन पुरस्कार, बेटी बचाओ, बेटी पढाओ पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे स्वागत होत आहे.

# गेट वे ऑफ इंडिया येथे ‘जागर संविधानाचा’ भव्य कार्यक्रम

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना जागतिक व्यासपीठावर नेण्याचा संकल्प - सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार

**मुंबई । प्रतिनिधी**

संविधान अमृत महोत्सव व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त सादर करण्यात आलेला जागर संविधानाचा गौरव विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांचा हा सांगीतिक कार्यक्रम केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न राहता, सामाजिक जाणीव जागवणारा हा सोहळा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानातून दिलेली मूल्ये, तत्वे आणि त्यांचे विचार जगाला मार्गदर्शक असून त्यांची ही मूल्ये व विचार जगाच्या व्यासपीठावर नेण्यात येणार असून अमेरिका आणि युरोपमधील विद्यापीठात सुध्दा चर्चासत्र, शोधनिबंध सादर करण्यात येतील, असा सांस्कृतिक कार्य विभागाचा मानस असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी केले.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये आमदार संजय उपाध्याय, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी मंत्री विजय उर्फ भाई गिरकर, राज पुरोहित, मुख्यमंत्री कार्यालयाचे व संस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभीषण चवरे यांच्यासह सिने, नाट्य व संगीत क्षेत्रातील मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

मंत्री श्री. शेलार म्हणाले, संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असताना सांस्कृतिक विभागातर्फे हा कार्यक्रम आयोजित करून संविधानाचा जागर करण्यात येत आहे. राज्यात या निमित्ताने चर्चासत्रे, उद्देशिकेचे वाचन, घरोघरी संविधान यासारख्या उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. याचबरोबर बाबासाहेबांचे विचार आणि भारतीय संविधान जागतिक विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी मांडण्याचा सांस्कृतिक विभागाचा संकल्प आहे. अरबी सागराच्या साक्षीने आणि गेट वे ऑफ इंडिया या ऐतिहासिक स्थळी हजारोंच्या उपस्थितीत ‘जागर संविधानाचा’ हा कार्यक्रम होत आहे. नाट्य, संगीत आणि नृत्य यांचा सुरेख संगम हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य असल्याचे मंत्री श्री. शेलार म्हणाले.

मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी व अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिनेते सुबोध भावे यांनी केले.

# जागतिक वसुंधरा दिनानिमित्त ‘पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ उपक्रमात सहभागी व्हा!

**मुंबई । प्रतिनिधी**

पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण करण्यासाठी जागतिक वसुंधरा दिन दिनांक २२ एप्रिल, २०२५ ते महाराष्ट्र दिन १ मे, २०२५ या कालावधीत पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने राज्यात ‘पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ (पर्यावरण बचाओ वसुंधरा सजाओ) हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी केले आहे.

‘पर्यावरण वाचवा वसुंधरा सजवा’ या उपक्रमांतर्गत मंत्री पंकजा मुंडे या स्वतः २२ एप्रिल रोजी मुंबईतील पवई तलाव येथे स्वच्छता मोहिमेत सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सर्व नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.

**नदी, नाले, तलाव स्वच्छता अभियानात सहभागी व्हावे**

श्रीमती मुंडे म्हणाल्या, २२ एप्रिल हा जागतिक वसुंधरा दिवस आहे. या दिवशी आम्ही पर्यावरण वातावरणीय बदल विभागामार्फत एक अत्यंत चांगली संकल्पना राबवत आहोत. ती संकल्पना म्हणजे जागतिक वसुंधरा दिवसाच्या पासून म्हणजे, २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिनापर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जसं आपण नवरात्र साजरा करतो, नऊ दिवस देवीच्या विविध रूपांची पूजा करतो, आराधना करतो, तसंच वसुंधरेची आराधना करण्यासाठी हे नऊ दिवस विविध कार्यक्रम आपण सर्वांनी राबवावेत. २२ एप्रिल रोजी या कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. मी स्वतः २२ एप्रिल रोजी पवई लेक मुंबई येथून स्वच्छतेची सुरुवात करणार आहे. दि. २२, २३ आणि २४ एप्रिल रोजी आपण सर्वांनी आपापल्या भागातील, आपल्या गावातील, आपल्या तालुक्यातील, आपल्या जिल्ह्यातील, आपल्या महानगरातील, नगरातील पाण्याचे विविध स्त्रोत साफ करायचे आहेत. नद्या, नाले, तलाव ह्यांची स्वच्छता करायची आहे. ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकापासून ते जिल्हा परिषद सीईओपर्यंत, तलाठ्यापासून ते जिल्हाधिकारीपर्यंत, ग्राम पंचायतच्या सरपंच, सदस्यापासून ते जिल्हा परिषद अध्यक्षापर्यंत आणि आमदार, खासदार, पालकमंत्री या सर्वांनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन श्रीमती मुंडे यांनी केले आहे.




याबरोबर शासकीय यंत्रणासमवेत वेगवेगळ्या संघटना, स्वयंसेवी संस्था यांनी देखील यामध्ये सहभाग घ्यावा. नदी - नाले, सरोवर स्वच्छ करणाऱ्या लोकप्रतिनिधीचे अधिकाऱ्याचे आणि सामाजिक संस्थेचे मूल्यमापन करून त्यांचा सुद्धा जिल्हा पातळीवर पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहणानंतर सन्मान होईल आणि राज्यभरातून अशा अत्यंत चांगल्या काम केलेल्या लोकांचा राज्यपातळीवरही सन्मान होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**रीड्यूस, री-यूज आणि रिसायकल या त्रिसूत्रीचा प्रयोग करणाऱ्यांचा होणार सत्कार**

दि. २५, २६ आणि २७ एप्रिल या तीन दिवसांमध्ये विविध संघटना, शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी या सर्वांनी मिळून रीड्यूस, रीयुज आणि रिसायकल या तत्त्वाप्रमाणे म्हणजे, आपण कुठल्याही चुकीच्या गोष्टींचा वापर कमी करणे म्हणजे रीड्यूस करणे, त्याचबरोबर कोणत्याही चांगल्या गोष्टी ज्या आपण परत परत वापरू शकतो त्यांचा रीयूज करणे आणि कुठल्याही गोष्टी जसे पाणी रिसायकल करतो आणि ते वापरतो त्यामुळे आपण वसुंधरेचा म्हणजे पृथ्वीचा फार मोठा फायदा त्याच्यामधून होतो आणि पर्यायी आपल्याला त्याचा फायदा होत असतो. त्यामुळे या त्रिसूत्री चा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र



## खडकी येथे श्री काळभैरवनाथ यात्रा उत्सवाचे आयोजन



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील खडकी येथे तिर्थक्षेत्र दर्जा 'क' असलेल्या श्री काळभैरवनाथ देवस्थान यात्रा उत्सवाचे आयोजन दरवर्षीप्रमाणे करण्यात आले आहे. कावडीने आणलेल्या पाण्याने श्री काळभैरवनाथाला अभिषेक, छबिना मिरवणूक, कुस्तीचा आखाडा यासह यावर्षी जुन्नर येथील स्वरसंगम आर्केस्ट्रा यांचा सुंदर असा गायन व नृत्याविष्काराचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या यात्रोत्सवाचा परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री काळभैरवनाथ ट्रस्ट समितीच्या वतीने करण्यात आले आहे. खडकी येथे ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड उन्हाचा पारा ४० शी गाठत आहें तरी देखील काही इमानदार कर्मचारी लाईटच्या पोलवर चढून काम करतांनाचे शिवापार्क कॉलनीतील छायाचित्रात दिसत आहे.*

# शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या निवासस्थानी मंत्री उदय सामंत यांची भेट

## शिवसेना नेतृत्व बीडमध्ये मुळुक यांच्या कायम पाठीशी : उदय सामंत

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेनेवर कितीही संकटे आली तरी त्याला सामोरे जाण्यासाठी आम्ही सर्व निष्ठावंत सज्ज आहोत असे प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केले. शिवसेना नेते तथा उद्योग मंत्री उदय सामंत हे बीड दौऱ्यावर असताना त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी मुळूक परिवाराच्या वतीने सामंत यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

उदय सामंत हे शिवसैनिक म्हणून कार्यरत असतानापासून त्यांचे आणि सचिन मुळूक यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. शिवसेनेवरील निष्ठेमुळे शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सामंत हे सध्या राज्याचे उद्योग मंत्री म्हणून भरीव काम करत आहेत. पूर्वाश्रमीचे शिवसैनिक असलेले उदय सामंत यांनी आजही मुळूक यांच्यावरील प्रेम तसूभरही कमी झाले नसल्याचे त्यांनी दाखवून दिले. गुंतवणूक परिषदेच्या निमित्ताने उद्योग मंत्री उदय सामंत बीड दौऱ्यावर आले असता जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी केलेल्या विनंतीला मान देत सामंत यांनी तात्काळ सर्व प्रोटोकॉल डावलून मुळूक यांच्या निवासस्थानी भेट दिली आणि



सामंत, मुळूक परिवारातील गोडवा कायम ठेवला. यावेळी मंत्री उदय सामंत, खासदार संदीपान भुमरे छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ यांचे बीडचे शिवसेनेचे पहिले नगराध्यक्ष शिवलाल मुळूक, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक व सर्व मुळूक कुटुंबीयांनी स्वागत केले. यावेळी उदय सामंत यांनी मुळूक यांच्या सारख्या कार्यकर्त्यांची वज्रमुठ शिवसेना व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कायम आहे असे सांगितले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर आदी उपस्थित होते.

## हमीभावाने खरेदी केलेल्या सोयाबीनची रक्कम तात्काळ मिळावी अथवा शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन परत करावे : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकार ने सोयाबीन ला ४८९२ रुपये इतका हमीभाव जाहीर केला होता. त्या प्रमाणे नेमून दिलेल्या हमीभाव केंद्रावर मोठया अपेक्षेने शेतकऱ्यांनी सोयाबीन घातले. सहा महिन्यांचा कालावधी लोटून गेला तरी अद्याप शेतकऱ्यांना हमीभावाची रक्कम मिळाली नही. शासनाने ही रक्कम तात्काळ द्यावी अन्यथा शेतकऱ्यांना त्यांचे सोयाबीन परत करण्याची मागणी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.



शेती मशागतीची कामे आटपून ग्रामीण भागात लग्नकार्य उरकुन घेण्याची तयारी शेतकरी करत आहेत. शेती मशागत खर्च, घराची - गायगोठ्याची डागडुजी हाती पैसा नसल्याने शेतकरी अडचणीत आहे. सोयाबीनला व्यापाऱ्यांनी अपेक्षित दर दिला नही, म्हणून शेतकऱ्यांनी हमीभाव केंद्रावर सोयाबीन घातले. परंतु आज सहा महिने उलटून गेले तरी हमी भावाची रक्कम अद्याप मिळाली नही. आज व्यापारी ४४०० रुपयांनी सोयाबीन खरेदी करत आहेत. हमीभावाचे पैसे सहा महिने वाट पाहूनही मिळत नसतील तर घातलेले सोयाबीन शेतकऱ्यांना परत द्यावे अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे.



*माजलगाव बीड अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ड. सुभाष भाऊ राऊत आणि सौ. सविता ताई राऊत यांच्या लग्नाच्या २५ व्या वाढदिवसानिमित्त हॉटेल सनराईज बीड येथे त्यांना शुभेच्छापर आशीर्वाद देताना आमदार मा. पंकजभाऊ भुजबळ*

## भारतीय बौद्ध महासभेच्या महिला तालुका अध्यक्ष पदी मंदाताई साळवे यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पुर्व अंतर्गत माजलगाव तालुक्यातील सांची बुद्ध विहार, डॉ आंबेडकर भवन केसापुरी वसाहत या ठिकाणी महिला तालुका कार्यकारीणी निवडीची बैठक आयोजित करण्यात आली या बैठकित भारतीय बौद्ध म हासभेत विविध पदावर कामकरत आसणा-या आद मंदाताई साळवे यांची तालुका महिला अध्यक्ष पदी निवड करण्यात आली तसेच तालुका सरचिटणीस पदी सुरेखा उर्फ कोमल डोंगरे तर कोषाध्यक्ष पदी अनुराधा साळवे याची निवड करण्यात आली या बैठकिच्या



अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जिल्हा अध्यक्षा आद .कमलताई डोंगरे ह्या होत्या तसेच या बैठकी साठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे अध्यक्ष आद. ॲड बी. बी. धन्वे सर जिल्हा संस्कार उपाध्यक्ष एस बी मोरे ,जिल्हा महिला संस्कार उपाध्यक्षा लिलाताई उजगरे, जिल्हा संस्कार सचिव शांमभाऊ वाघमारे, जिल्हा महिला संस्कार सचिव संजिवनीताई धन्वे, आशा ताई मोरे , जिल्हा पर्यटन सचिव के व्ही साळवे, एन बी राजभोज, जिल्हा संरक्षण सचिव, पुष्पाताई गायकवाड,जिल्हा संघटक शोभाताई भोजने, शारदाताई तांगडे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## गोळीबार प्रकरणातील सराईत आरोपीला गोंदी पोलीसांनी केले अटक

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील शहागड पैठण फाटा येथे दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास आरोपी नामे बाळासाहेब भगवान मस्के वय ३६ वर्षे रा. रेवकी देवकी ता. गेवराई जिल्हा बीड व त्याचा मित्र जखमी नामे तात्या ऊर्फ कबीर प्रकाश सोनवणे वय २७ वर्षे रा. आगर नांदुर ता. गेवराई जिल्हा बीड हे आरोपी बाळासाहेब मस्के यांचे एम जी ग्लोस्टर वाहन क्रमांक एम एच १२ टी डी ००९९ मध्ये सोलापुर औरंगाबाद एन एच ५२ हायवेवरुन औरंगाबाद कडे जात असताना पैठण फाटा शहागड या ठिकाणी आरोपी बाळासाहेब मस्के यांने त्याचे कडील अवैध पीस्टल ने तात्या ऊर्फ कबीर प्रकाश सोनवणे यास गोळी मारुन जखमी केले होते सदर घटने बाबत जखमीचे वडील प्रकाश कोडींबा सोनवणे यांचे फिर्यादी वरुन गोंदी पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ३७७/२०२४ कलम १०९,३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ३/ २५ शस्त्र अधिनियम प्रमाणे दिनांक १५ डिसेंबर रोजी गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयात तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर प्रभारी अधिकारी गोंदी पोलीस स्टेशन यांनी गुन्हयाचा सखोल तपास करुन गुन्हयातील आरोपी नामे बाळासाहेब भगवान मस्के याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न करुन आरोपीस दिनांक १७ एप्रिल २०२५ रोजी आरोपीस अटक करुन मा.न्यायालयासमक्ष हजर केले असता आरोपीची ३ दिवस पोलीस कस्टडी रिमांड देण्यात आली आहे. सदर आरोपी हा

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड ते वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरु

**बीड । प्रतिनिधी**

अहमदनगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला गती आलेली आहे. बीडपर्यंत रेल्वे रूळाचे काम पुर्ण झाल्याने आता बीड ते परळी या महत्वाच्या -टप्याचे काम देखील वेगात सुरू आहे. आज बीड वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरू करण्यात आली.

अहमदनगर येथील रेल्वे स्थानकातून निघालेले रेल्वे इंजिन काल रात्री उशिरा बीडच्या रेल्वे स्थानकात आले होते. त्यानंतर



आज सकाळी बीड ते वडवणी रेल्वे इंजिन ट्रायल सुरू करण्यात आली. बिंदुसरा नदीवरील रेल्वे पुलावरून हे इंजिन वडवणीकडे निघाले आहे. दहाच्या स्पिडने या इंजिनची ट्रायल सुरू असुन इंजिनला जोडून असलेल्या मालगाडीत नवीन पटरी आणि रॅक आणण्यात आले आहे. बीड ते वडवणीपर्यंतच्या रेल्वे रूळाचे काम पुर्ण झाले असुन त्याच अनुषंगाने हायस्पीड रेल्वे चाचणीच्या आधी इंजिन ट्रायल घेण्यात आली. या मार्गावर पहिल्यांदाच रेल्वे इंजिनची झुक-झूक आयकायला आल्याने लोकांनी हे पाहण्यासाठी गर्दी केली होती.

## अंबाजोगाईमध्ये गुटखा वाहतुक करणारी ओमीनी कार पकडली



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

उपविभाग मध्ये चालणारे अवैध धंद्यांची गोपनिय माहीती काढुन कडक कारवाई करण्याचे आदेश वरीष्टांनी दिले होते. त्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेला गोपनिय बातमीदारामार्फतीने माहीती मिळाली की अंबाजोगाई येथुन चनई रोडने एक पांढर्या रंगाचे ओमीनी चार चाकी कार मध्ये गुटखा विक्री साठी वाहतुक केली जात आहे अशी माहीती मिळालेवरुन मौजे डोंगरपिंपळा येथे हनुमान मंदीराचे समोर स्थानिक गुन्हे शाखेने सापळा लावुन थांबले असता समोरुन येणार्या कारला हाथ करुन थांबवले असता कार जागीच थांबवुन गुटखा वाहतुक करणारा ईसम अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला त्याची माहीती घेतली असता त्याचे ▶▶ उर्वरित पान २ वर

## चोरीच्या संशयावरून महिला पकडली

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अंकुशनगर भागात एक अनोळखी महिला संशयित रित्या फिरताना नागरिकांनी पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. या भागातील नागरिकांनी या महिलेवर पाण्याची मोटार चोरीचा आरोप केला आहे. तर पोलिसांना बोलावून महिलेला ताब्यात दिले. शिवाजीनगर पोलीस अधिक तपास करीत आहेत. सदरील महिला ही करंजी ते बीड असा प्रवास करुन ३ वाजून २१ मिनीटाची वेळ तीच्याकडे सापडलेल्या तिकीटावर वेळ आहे. मागील काही दिवसांपासून अंकुशनगर भागातील पाण्याच्या मोटारी चोरी जाण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे येथे मोटार चोरणारी टोळी सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. अशोक पाखरे यांची मोटार चोरी गेली अन् ही महिला दिसून आल्याने नागरिकांनी पकडले आहे. ही महिला मोटार चोरणाऱ्या टोळीची असु शकते असा अंदाज

▶▶ उर्वरित पान २ वर

## पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन

### महादेव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक

**बीड । प्रतिनिधी**

२० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य म होत्सवी वर्षानिमित्त सिहोर येथील पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन दि. ७ ते १४ जून २०२५ या कालावधीत श्री क्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रम ाच्या नियोजनासाठी



गुरुवार दि. २४ एप्रिल रोजी रविराज मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड, बीड येथे सायंकाळी ५ वाजता शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या म ार्गदर्शनाखाली होणार आहे.

शिवपुराण कथेच्या नियोजनासाठी आणि विविध समित्यांचे गठण करण्यासाठी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व डॉक्टरांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्वांच्या सहकार्याने पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचे नियोजन करण्यात येणार असून हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरुपात पार पाडण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील सर्व डॉक्टर मंडळींनी या बैठकीस मोठ्या संख्येने सहभागी होवून हे कार्य सिद्धीस नेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवपुराण कथा आयोजन समिती आणि महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.




CMYK